

# K. K. Wagh Education Society, Nashik

**Central Office:** Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, **NASHIK**-422003.
**Ph. No.** (0253) 2221106, 2221111, 2221120 **Fax:** (0253) 2518870
**Email Id:** disp-co@kkwagh.edu.in **Website:** www.kkwagh.edu.in

✓ Quality Education ✓ Good Placement

Registration for Institute Level

# ADMISSIONS OPEN

## ENGINEERING COLLEGE

(Eight branches accredited by NBA, New Delhi, NAAC 'A' grade)

**Name of Course**

**Under Graduate Courses (First Year Engineering)**

- Computer Engineering
- Electronics & Telecommunication
- Civil Engineering
- Mechanical Engineering
- Electrical Engineering
- Chemical Engineering
- Information Technology
- Artificial Intelligence & Data Science
- Robotics & Automation Engineering

**Post Graduate Courses**

- MBA
- MCA

**Register Online:** tinyurl.com/kkwadmission
**Website:** https://engg.kkwagh.edu.in
**Email Id:** admission2020@kkwagh.edu.in
**Contact:** Mr. Shirode: 7888045550, (0253) 2221310, 2512876

## POLYTECHNIC, NASHIK

(Four branches accredited by NBA, New Delhi)

- Computer Technology
- Civil Engineering
- Electrical Engineering
- Chemical Engineering
- Mechanical Engineering
- Information Technology
- Electronics & Telecommunications
- Advanced Diploma in Industrial Safety (IT)*

*One year Non-AICTE course

**Register online** : tinyurl.com/y6e3zepx
**Website** : https://poly.kkwagh.edu.in
**Email id** : srshinde@kkwagh.edu.in
**Contact** : Mr. Gaikwad: 9970851899 / Mr. Jadhav: 7350561717

## AGRICULTURE & ALLIED COLLEGES

- College of Agricultural Engineering & Technology
- College of Agriculture
- College of Agricultural Bio-technology
- College of Food Technology
- College of Agriculture Business Management
- College of Horticulture

**Register Online** : tinyurl.com/yyze49nb
**Website** : https://agri.kkwagh.edu.in
**Email id** : principal-btechfood@kkwagh.edu.in
**Contact** : Mr. Nikam: 9822260250, (0253) 2555223

## PHARMACY COLLEGE

### B. PHARMACY

### D. PHARMACY

**Website** : https://pharmacy.kkwagh.edu.in
: https://dpharmacy.kkwagh.edu.in
**Email id** : principal-bpharmacy@kkwagh.edu.in
: principal-dpharmacy@kkwagh.edu.in
**Contact** :
**For B. Pharm** : Dr. S. P. Narkhede : 8446231031
**For D. Pharm** : Prof. R. A. Herole : 9764857838

## वैशिष्ट्येः

- गेली ५० वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारी नामवंत शिक्षणसंस्था.
- सध्या के.जी.पासून पि.एच.डी पर्यंत विविध शाखांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सोय उपलब्ध.
- NBA ॲक्रीडिटेड तंत्रशिक्षण व अभियांत्रिकी शिक्षण प्रदान करणारी नामांकित संस्था.
- महाराष्ट्र स्तरावतील सर्वोत्कृष्ट तंत्रनिकेतनचा पुरस्कार प्राप्त तंत्रनिकेतन.
- विद्यापीठ स्तरावर दैदिप्यमान निकालाची परंपरा, अनेक विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.
- सर्वाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारी संस्था.
- ६ विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी संस्था.
- विद्यार्थी विकास केन्द्रीत शिक्षणावर भर देणारी संस्था.

लोकमत



# सर्वसामान्यांसाठी आश्वासक चेहरा!

बाळासाहेब देवराम वाघ

अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था

भारतीय राजकारणात शरद पवार साहेब यांच्या नावाला जे वलय आहे, ते त्यांनी राजकारणापुरते मर्यादित न ठेवता आपले समाजकारण आजपावेतो सुरू ठेवले आहे. शेतकऱ्यांची काळजी घेणारा जाणता राजा, देशपातळीवर शेतकऱ्यांसाठी लढणारा एकमेव आश्वासक चेहरा म्हणजे पवार साहेब होय. साहेबांनी आजवर शेतकऱ्यांचे असंख्य प्रश्न हाती घेऊन, ते तडीस नेले आहेत. शिक्षण क्षेत्रात साहेबांनी अफाट काम केले आहे. देशातील कृषी क्षेत्र व कृषी शिक्षणाची जाण आणि काम केलेला एकमेव नेते म्हणजे पवार साहेब होय.

गेल्या पंधरा वर्षांपासून असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ ॲग्रिकल्चर ॲण्ड ॲग्रिकल्चर अलाईड कॉलेजेस या राज्यस्तरीय असोसिएशनचा अध्यक्ष म्हणून कामकाज पाहत असताना कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांना असंख्य समस्यांना सामोरे जावे लागते. या असोसिएशनमध्ये राज्यातील १५० विनाअनुदानित कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये असून, त्यापैकी ९३ महाविद्यालये ही सभासद महाविद्यालये आहेत. या सर्व कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांना प्रोफेशनल कोर्सचा दर्जा नव्हता.

## समान न्यायदृष्टी

**केंद्र व राज्य सरकारला कृषी शिक्षणासंदर्भात असोसिएशनच्या माध्यमातून आम्ही वेळोवेळी प्रश्न मांडत असतो. त्यावर त्वरित कार्यवाही व्हावी, यासाठी व कृषी शिक्षण घेणारे विद्यार्थी व संस्थाचालकांना समान न्याय देण्याच्या दृष्टीने पवार साहेब नेहमीच प्रयत्नशील असतात.**

कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांना प्रोफेशनल कोर्सचा दर्जा मिळावा, यासाठी २०१७ साली ॲग्रिकल्चर असोसिएशनच्या वतीने भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांना विनंती केली होती. पवार साहेबांच्या प्रयत्नामुळे केंद्र सरकारने कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांना प्रोफेशनल कोर्सचा दर्जा मिळाला आहे.

दिनांक ७ ऑक्टोबर २०२० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांच्या असलेल्या विविध समस्यांविषयी पवार साहेब यांची भेट घेतली याप्रसंगी असोसिएशनच्या पदाधिका-यां समवेत विविध समस्यांविषयी सकारात्मक चर्चा झाली. याचेच एक उदाहरण म्हणजे पवार साहेब केंद्रीय कृषिमंत्री असताना अभियांत्रिकी आणि तंत्रनिकेतन महाविद्यालयांप्रमाणे कृषी महाविद्यालायांचे देखील ॲक्रिडिएशन व्हावे, असा त्यांचा आग्रह होता. यासाठी त्यांनी डॉ. सी. डी. माळी यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन केली. पवार साहेबांचे असेच सहकार्य के. के. वाघ शिक्षण संस्थेलादेखील लाभत आलेले आहे. पवार साहेबांचे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना मूळ प्रवाहात आणून त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने प्रेरणा देणारेच ठरावेत.

# अभियांत्रिकीची केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया सुरु

अकोले●शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अभियांत्रिकी पदविका प्रवेश प्रक्रियातील प्रथम व थेट द्वितीय वर्षाकरिता नोंदणी प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून ८ ऑगस्ट २०२० पासून सुरु करण्यात आली आहे. यामध्ये आपल्या आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भागातील भरपूर विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यातील केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेतील प्रथम फेरी ही दि. १२ ते १४ डिसेंबर पर्यंत सुरु करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी फॅकल्टी ऑफ पॉलिटेक्निक, अकोलेच्या एफसी सेंटरवर जाऊन आपल्या पुढील प्रवेशासाठी केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेतील प्रथम फेरीत सहभागी व्हावे. तसेच ज्या महाविद्यात आपला प्रवेश होईल तेथे दि. १७ ते १९ डिसेंबरपर्यंत त्या महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित केल्याची खात्री करावी. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष जे. डी. आंबरे पाटील, यशवंतराव आभाळे, डॉ. आर. डी. पल्हाडे यांनी दिली आहे.

पुढारी

# के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेत रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन इंजिनिअरिंगची संधी

**थोडे हटके पण अचूक करिअर**

रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन इंजिनिअरिंग ही अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील नवीन विद्याशाखा असली तरी आता ती आजच्या तरुण पिढीचे विशेष आकर्षण ठरत आहे. त्यास कारण असे की, २१ व्या शतकातील तरुणांना रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन अभियांत्रिकीचे ज्ञान असले पाहिजे, असे अनेक क्षेत्रांतील तज्ज्ञांचे ठाम मत आहे. त्याचप्रमाणे, आता भारतात तसेच जगभरात अनेक मोठ्या स्वयंचलित उद्योगक्षेत्रांमध्ये रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन अभियंत्यांना करिअरच्या मोठ्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत.

रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन हे अभियांत्रिकीचे असे एकमेव क्षेत्र आहे की, जिथे बरीच वैज्ञानिक, वैद्यकीय व तंत्रज्ञानाची क्षेत्रे एकत्र भेटतात. म्हणूनच की काय, अलीकडच्या काळात लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन हे सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. त्यामुळेच आता आपल्याला ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशनच्या भविष्यातील संभाव्यतेविषयी काही आनंददायक कल्पना तसेच काही उच्च अपेक्षासुद्धा आहेत. हेही स्पष्टच आहे. सध्याच्या वाढत्या औद्योगिकीरणाच्या व्याप्तीत वस्तू आणि सेवांच्या उत्पादनात अतिजोखमीच्या व अवघड ठिकाणी मानवी कार्याची आवश्यकता कमी करण्यासाठी रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन अभियांत्रिकी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले



आहे. रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन म्हणजे हार्डवेअर अॅण्ड सॉफ्टवेअर प्रणाली एकत्र करून दुसऱ्या प्रणालीला नियंत्रित करणे, ज्याद्वारे संपूर्ण मानवरहित किंवा माणसाच्या देखरेखीखाली स्वयंचलित प्रक्रिया तयार करता येते. त्यामुळे उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल, ऊर्जा, वेळ व पैसा यांचा समतोल राखून वाजवी खर्चात जास्त उत्पादन करणे शक्य होते.

रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन अभियांत्रिकी या विद्याशाखेच्या अभ्यासक्रमात बेसिक मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगच्या विषयांसोबतच रोबोट्सची संकल्पना, रोबोटचे डिझाइन व रोबोटचे उत्पादन तसेच रोबोटचे ऑपरेशन व प्रोग्रामिंग या महत्त्वाच्या विषयांचा प्रामुख्याने समावेश आहे. रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन इंजिनिअरिंगच्या पदवी अभ्यासक्रमातून मिळविलेल्या मानाचा वापर विद्यार्थ्यांना प्रगत वाहन उत्पादन कंपन्या, सुपर स्पेशालिटी रुग्णालय आणि आरोग्य सेवा, हायटेक बांधकाम, शेती, अन्नप्रक्रिया, सुरक्षा आणि सैन्य यांसारख्या क्षेत्रात करता येणार आहे.

– डॉ. नानासाहेब गुरुळे
संपर्क : ९९२२६२६७३४



# वाघ अभियांत्रिकीमध्ये गणित दिन साजरा

**नाशिक: प्रतिनिधी**

के.के.वाघ शिक्षण संस्था संचालित के.के.वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था नाशिकच्या विज्ञान व गणित विभागातर्फे भारतीय गणितज्ञ श्रीनिवासा रामानुजन यांचा जन्मदिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

या दिवसाचे औचित्य साधून विद्याप्रतिष्ठान बारामती संचालित कमलनयन बजाज अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विज्ञान विभागाचे विभागप्रमुख डॉ. ए.पी. झिंबरेकर यांचे रिसेन्ट ॲप्लिकेशन्स ऑफ मॅथेमॅटिक्स इन इंजिनीरिंग या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

झूम प्रणालीच्या माध्यमातून आयोजित या व्याख्यानात सहभाग नोंदविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस ऑनलाईन प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या व्याख्यानासाठी सर्व विभागप्रमुखांसह सर्व विभागांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच विद्यार्थी व संस्थेबाहेरील शिक्षकांसह सुमारे ३०० इच्छुकांनी सहभाग नोंदविला.

सूत्रसंचालन प्रा. ऋतिका भाटिया यांनी केले तर डॉ. एस. एस. नाईक यांनी आभार मानले. या उपक्रमाच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ व सचिव प्रा. के. एस.बंदी यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**25-12-2020, Gavakari**